International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 Nov-Dec 2023

# आशा बगे यांची कथा

**डॉ. शकुंतला मिठाराम भारंबे**
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, ता. यावल जि. जळगाव
**Corresponding Author – डॉ. शकुंतला मिठाराम भारंबे**
**Email: –** smbharambe37@gmail.Com
**DOI- 10.5281/zenodo.10559641**

**प्रस्तावना –**

साधारणतः १९७५ नंतरच्या वाङ्मयीन कालखंडात नवकथेच्या वाटेने नवे सामर्थ्य जपलेली कथा म्हणजेच आशा बगे यांची कथा. हे समीकरण अगदी योग्यच आहे याची साक्ष आशा बगे यांच्या कथावाडमयाकडे दृष्टीक्षेप टाकला की सहज लक्षात येते. आशा बगे यांच्या नावे आज बारा कथासंग्रह आहेत. १९८४ साली त्यांचा 'मारवा' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला त्यानंतर 'अत्तर', 'पूजा',' चंदन', 'मांडव', 'अनंत', 'ऋतुवेगळे', 'निसटलेले', 'दर्पण' असे एकापेक्षा एक सकस कथासंग्रह रसिक वाचकांचे लक्ष वेधणारे ठरले. आजपर्यंत मनस्विनी, झुंबर, त्रिदल, धर्मक्षेत्र, कुरुक्षेत्र, भूमिका, उत्सव व भूमी या कादंब-यासुद्धा प्रकाशित झालेल्या आहेत. अशा प्रतिभावान लेखिकेचा जन्म २७ जुलै १९३९ ला नागपूरमध्ये झाला. पूर्वाश्रमीच्या आशा देशपांडे त्यांचे प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण नागपूरमध्येच झाले. खैरागढ विद्यापीठाची संगीत विषयात एम. ए. ही पदवी त्यांनी घेतली. लहानपणापासूनच उच्च मध्यम वर्गीय एकत्र ब्राम्हण कुटुंबाचे संस्कार, आईचे व आजीचे नाटकाचे व किर्तनाचे संस्कार, घरी संगीताचे वातावरण त्यामुळे त्यात विशेष अभिरुची या सर्व अनुभवविश्वाचा उपयोग आशा बगे यांनी आपल्या लेखनासाठी केला. जे अनुभवले ते लेखणीतून उतरले. या प्रांजळपणाने त्यांनी लेखन केले आहे. याच अनुभवविश्वाची साक्ष देणारे त्यांचे कथालेखन आहे.

कालौघ्यात बरेच काही टिकून राहते आणि बरेच काही बदलत असते. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण, समृध्दी यांचे वारे मध्यमवर्गीयांपर्यंत जाऊन पोहोचले व हळूहळू या वर्गाची जीवनशैली बदलू लागली. या बदलत्या जीवनशैलीसह मध्यमवर्गीयांच्या सामान्य व्यवहाराचे चित्रण करीत स्वाभाविक सहज व्यक्तिचित्रणातून गतकाळ आणि वर्तमान यांची सांगड घालणाऱ्या कथा लालित्यापेक्षा सहजतेवर, वास्तवतेच्या चित्रणावर भर घालतात. त्यामुळे त्यांच्या कथा या कथा म्हणून भूरळ पाडण्याआधी जीवनानुभव म्हणूनच रुचतात, पटतात. तसेच शरीर आणि मन यातील अनुबंध स्त्रीयांच्या बाबतीत खूप घट्ट असतात. शरीर मनाचे हे अतूट नाते आशा बगे यांच्या कथेत रेखाटलेले आहे.

**ऋतूवेगळे –**

हा त्यांचा कथासंग्रह त्यांच्या या नेहमीच्या वैशिष्ट्यांचा प्रत्यय पुन्हा एकदा तेवढ्याच तीव्रतेने देतो. साधारणतः कथासंग्रहातील एखाद्या कथेचेच नाव पुस्तकाला देण्याची रुढ प्रथा मोडून या संग्रहाला ऋतूवेगळे हे स्वतंत्र नाव देण्यात आले आहे. कथासंग्रहातील सर्व कथांमधून एक समान सूत्र असलेच पाहिजे असे नाही परंतु या कथासंग्रहाच्या 'ऋतूवेगळे' या शीर्षकाच्या संदर्भात असे काही सूत्र शोधण्याचा प्रयत्न केला तर यातील पाचही कथांमधून एक वेगळा ऋतू आपल्याला भेटतो. तो ऋतू असतो स्त्रीविषयक जाणिवांचा, स्त्रीमनाच्या विविध पैलूंचा आणि स्त्रीच्याच काही सनातन दुःखांचा! 'पंख' आणि 'मल्हार' या दोन्ही कथा अर्थिकदृष्ट्या आणि संस्कारदृष्ट्या या मध्यमवर्गीय असलेल्या कुटुंबाच्या वाट्याला हमखास येणाऱ्या घालमेलीच्या कथा आहेत. मुलगी दाखविणे, मुलगी पसंत करणे या पारंपरिक प्रकाराला पर्याय असा काही समर्थ तोडगा जोवर सापडत नाही तोवर हे प्रकार सुरुच राहणार आहेत. सुंदर मुली आणि ज्यांचे आईवडील 'जावई विकत घेऊ शकतात' अशा मुली यांचे लग्ने पटकन जुळतात. परंतु दिसायला रंगरुपाने सामान्य असलेल्या मुली आणि आर्थिकदृष्ट्या बेताचेच असलेले तिचे पालक यांना तिच्या डोक्याला वाशिंग बांधण्यासाठी जे काही करावे लागते त्याला अनेकदा नरकयातना हा शब्दही कमी पडतो. एखाद्या गावी योग्य मुलगा असल्याचे कळल्यावर त्या गावातील आपल्या मित्राकडे अथवा नातेवाईकाकडे मुलीला घेऊन जाणे या सूत्राभोवतीच या दोन्ही कथा गुंफलेल्या आहेत. 'पंख' या कथेत आपल्या नातेवाईकाकडे आलेली कमू ही अशीच मुलगी आहे. त्या नातेवाईकाच्या घरातील मीनू या चिमुरडीच्या नजरेतून घटनांचा वेध घेतांना निरागस मीनू आणि लग्नाच्या बाजारात मागे पडलेली कमू यांच्यात निर्माण झालेल्या स्नेहाच्या धाग्यांमधून एका क्रूर वास्तवाचे

दर्शन होते. 'परागमामाशी कनूताईचं लग्न का नाही ठरवत तू?' या मीनूच्या प्रश्नावर तिच्या आईने दिलेले उत्तर - वेडी का तू मीनू! 'पराग एवढा इंजिनीयर गोरापान.... यातून निष्ठुर वास्तव आणि निरागस बाल्य याचे जे दर्शन घडते ते आतडे पिळवटून टाकते. त्याचप्रमाणे 'मल्हार' या कथेतील मुलीच्या लग्नाचा ध्यास घेतलेले कुटुंब आणि मुलगी दाखविण्यासाठी नागपुरहून मध्यप्रदेशातील सागर येथे जाऊन आपल्या मित्राकडे रहायला आलेले देसाई मास्तर हे 'पंख' मधील वास्तवाचाच एक वेगळा अविष्कार आहेत. उन्हाळयात सुट्टीत सुबीआत्याकडे राहायला आलेल्या विक्रम व मंजू या दोन मुलांची 'पत्र' ही कथा एका बाजूला आर्थिक स्तर उंचावल्यावर नातेसंबंधात येणा-या पातळपणाची कहाणी आहे तर दुसऱ्या बाजूला हतबल सुबीआत्याची कथा आहे. या कथेत कवितेची आवड असलेली सुबीआत्या आणि श्रीमंतीला साजेसे वागणारे तिचे अन्य कुटुंबीय यांच्यात निर्माण झालेले अंतर आत्याकडील आधीचे कौटुंबिक वातावरण आठवूण आत्याच्या गावी आलेल विक्रम, मंजू व त्यांचे आईवडील यांच्या व्यक्तीचित्रणातून गेल्या काही वर्षातील सामाजिक बदलांचे प्रतिबिंब उमटले आहे. 'ऋतुवेगळे' या कथासंग्रहातील 'शिल्प' ही एकमेव कथा अशी आहे ज्यात व्यक्तीचित्रण, वातावरण निर्मिती, अनुभवाची सर्वसमावेशकता या ऐवजी व्यक्तिरेखांच्या मर्यादित विश्वाला प्राधान्य दिलेले आहे. त्यामुळे धक्कातंत्र, भास यांचा वापर केलेल्या या कथेचा प्रभाव मर्यादित राहतो. आधुनिकतेची समाजानं पांघरलेली झुलही तोकडी असल्याचे वास्तव दाखविण्याऱ्या कथा ऋतुवेगळे या संग्रहात आहे म्हणून हा अत्याधुनिक कथांचा संग्रह आहे असे म्हणता येईल.

**पूजा –**

मध्यमवर्गीय ब्राम्हण कुटुंबातील व्यक्तींचे, नातेसंबंध त्यांचे रितिरिवाज आणि त्यांचे दैनंदिन जीवन यांचे सुस्पष्ट प्रतिबिंब आशा बगे यांच्या कथांतून नेहमीच प्रत्ययास येते. ह्या कुटुंबातील वृध्द माणसे, तरुण-तरुणी, कोवळी मुले, कोणी विद्यार्थी, कोणी गायक, कोणी आश्रीत, कोणी दृष्टीहीन या सर्वांच्या दैनंदिन जीवनातल्या छोट्यामोठ्या घटनांचे चित्रीकरण पूजा या कथासंग्रहातून प्रत्ययकारीरित्या आले आहे. छोट्या शहरांमधले शांत वातावरण, लहान-मोठ्या पात्रांची मानसिक आंदोलने, छोट्या- मोठ्या संवादांमधून आणि अल्पाक्षरी वर्णनांमधून डोळयांसमोर उभी राहणारी त्यांची व्यक्तीचित्रे वाचकांना एका वेगळया वातावरणात घेऊन जातात.

**निसटलेले-**

नात्यांना समजावून घेतांना खूप काही 'निसटलेले' असते. जीवनाचे हे सूत्र मांडणाऱ्या कथा या कथासंग्रहात आहे. स्त्री-पुरुष संबंधातील शोध हा न संपणारा आहे. माणसाचे मन हा विषयच कधीही तळ न सापडणारा असा. त्यात स्त्री-पुरुष नाते हे कितीतरी वेगळया पातळीवर असणारे. या नात्यांना समजून घेऊन त्याप्रमाणे वागतांना मनात असलेले खूप काही क्षण निसटून जातात. हे निसटलेले क्षण माणसाला अनुभवता येतात, पण सर्जनशील कलाकाराला अचूक मार्मिक शब्दात साकारताही येतात. आशा बगेंनी हे निसटलेले क्षण कथा सप्तकात सादर केले आहे. या सर्व कथांमध्ये आशा बगेंची एक खास भाषाशैली आहे. गुंतागुंत-उकल-निराकण-सनसनाटी या सगळयाच पायऱ्या ओलांडून या कथा एका उंचीवर पोहोचतात. नातेसंबंध जपतांना निसटलेले क्षण उलगडणाऱ्या भावस्पर्शी कथा आहे.या कथांच्या संदर्भात कथासंग्रहाच्या मलपृष्ठावरील मजकूर महत्त्वाचा वाटतो त्यात असे म्हटले की," वर्षानुवर्षे सहवास असूनही जीवनातील अनाकलनियता, मानसिक गुंतागुंत आणि वर्तनातील अगतिकता यातून निसटलेले जगणे मात्र हतबल करीत नाही, तर आणखी जगण्याची उमेद देते. जीवनाचे हे सूत्र आशा बगे यांच्या कथांमधून सहजपणे प्रत्ययाला येते."

**मारवा –**

या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा पुरस्कार मिळालेला आहे. प्रामुख्याने जीवनसंघर्षावर आधारित कथांचा हा संग्रह वाचकाला अंतर्मुख करतो. सुयोग्य मांडणीमुळे मारवा कथासंग्रहातील कथा परिणामकारक झाल्या आहेत. लेखिकेचे कथालेखनाचे कौशल्य अधोरेखित करणारा हा कथासंग्रह कथाप्रेमी वाचकांना आवडेल असाच आहे.मात्र यातील रुक्मिणी ही कथा अतिशय गाजली. रुक्मिणी या कथेत कीर्तनातल्या पदांशी कथानायिकेच्या आंतरमनातील स्वगताशी अनुबंध जोडण्याचे तंत्र हे रचनातंत्र म्हणून नोंदविता येईल. कधी रोमैटिक वातावरण व गूढ हुरहूर निर्माण करण्यासाठी काव्याचा उपयोग केला गेलेला दिसतो. त्यांच्या या कथेत तीन पिढ्यांतील स्त्रियांच्या व्यक्तिरेखा येतात. मावळत्या पिढीची आजी, मधल्या पिढीची काकू व आत्याबाई, आजच्या पिढीची रुक्मिणी व शकू या तीन पिढ्यांतील स्त्रियांच्या मानसिक जडणघडणीचा व प्रवृत्तीविशेषांचा शोध घेता येतो. आधुनिक पिढीतील रेणूचीअवस्थांतरे- बालपण-पौगंडावस्था-नववधू-कुलवधू तिचे सामाजिक समायोजन व मानसिक अवस्थांचे प्रतीकात्मक दर्शन यामुळे कलात्मकदृष्ट्या ही सारी कथाच एका अवघड वळणावर उभी आहे. कारण एक स्वतंत्र होऊ पाहणारी स्त्री सगळया परंपरेला, कुटुंबव्यवस्थेला, समाजाला अनेक प्रश्न करते आहे. या कथेच्या संदर्भात अशोक राजवाडे म्हणतात,"शेवट हा अनंता व रेणू यांच्यातील तात्पुरता समेट म्हणून पण आश्रित व आश्रयदाता या संबंधामुळे रेणुच्या पुढच्या आयुष्यात मानभंग होऊ शकणार नाही याची शाश्वती नाही. रेणूचे नातेही पूर्णपणे विरघळून जाण्याचे किंवा नतमस्तक होण्याचे नाही. त्यामुळे हा फिल्मी गोड शेवट वाटतो." तसेच मंगला वरखेडे यांनी असे म्हटले आहे की, "

स्त्रीमनाच्या शरीरनिष्ठ छेद ही कथा लेखिकांच्या शोधाची संपूर्णपणे आधुनिक वळणांची आहे. स्त्रीदेहासंबंधीच्या वाङ्मयीन संकेतांचे वळण ओलांडणारी नवीनता या कथेमध्ये आहे. ही नवीनता अर्थातच निखळ स्त्रीनिष्ठ आहे. पुरुषकेंद्री अनुभव विश्वाचे कोणतेही ओझे न वागवता वाङ्मयीन संकेतांच्या परंपरेपासून मुक्त असलेली ही कथा तितकीच निर्मळ सुंदर आणि कलात्मक सर्जनशीलतेचा एक हृदय आविष्कार आहे."

**दर्पण –**

दर्पण मधील कथांतील वातावरण कथावस्तूला स्थळकाळाची चौकट पुरवते. निवेदक जे बारीकसारीक तपशील समोर ठेवतो त्यातून वातावरण जिवंत झाल्याचा अनुभव जवळजवळ सर्वच कथांतून येतो. त्यातही 'पाऊस' 'नाटक' 'देणं' व 'अज्ञान' या कथातून तो अधिक येतो. 'पाऊस' या कथेतील पावसाचे आणि 'अज्ञात' या कथेतील उन्हाचे वर्णन, त्यांची विविध रुपे आणि व्यक्तीरेखांची भावस्थिती आविष्कृत करते. ते केवळ वर्णन व वातावरणनिर्मितीपुरतेच मर्यादित राहत नाही तर त्यांना जणू एखाद्या पात्राइतकेच अस्तित्व प्राप्त झाले आहे. 'देणं' या कथेतील संगीत कथाशयाशी एकरुप झाले आहे असे म्हणण्यापेक्षा ते कथाशय घडविते असेच म्हणावे लागेल. शास्त्रीय संगीत, त्यातील विविध राग, त्यांच्या बंदीशी, त्यांची रुपे यांचे सुक्ष्म तपशील या कथाशय मूर्त करतात. या कथेतले महादेवकर मास्तर गाणे शिकवितात, गाणे जगतात, गाण्यातच जगतात! आपली गायनशाळा, तिथले विद्यार्थी, वाद्ये आणि संगीत या पलीकडच्या जगाशी कसे जमवून घ्यायचे हे गणित त्यांना कधीच सुटणारे नसते. सुरांचे वरदान लाभलेली त्यांची विद्यार्थीनी बाबी त्यांना म्हणते, 'स्वर कळतात तुम्हाला, सर, पण माणसं कळतं नाही", कथेमध्ये भाषेलाही संगीतासारखीच एक अंगभूत लय आहे. आशा बगे यांचे भावानुभवाचे रुप व्यक्त करण्याचे शब्दयोजनकौशल्य व भाषेचे कलात्मक सामर्थ्य पुढील वर्णनातून प्रत्ययास येते. उदा." त्यानं हळूहळू षडज लावला. स्थिर, वजनदार षडज, स्वरांची वलयं त्या खोलीतल्या फिकट प्रकाशावर उमटत गेली आणि निषाद-गांधारावरुन त्यानं शुध्द मध्यमाला इतका हलकेच स्पर्श केला, की मास्तरांच्या अंगावर सर्रकन काटा आला. देवावर वाहिलेल्या फुलासारखा तो अनाघ्रात, शुध्द मध्यम!" 'दर्पण' ही शिर्षक कथा सर्वात लक्षवेधी कथा आहे. 'स्वामी', 'अनोळखी', 'अज्ञात', 'देणं' इ कथांमधून प्रकटणारे मानवी जीवन, विविध रंगी अनुभवांनी आणि आघातांनी घडणारी बदलणारी माणसे व त्यांच्यातील घडत- मोडत-बदलत जाणारे संबंध यांचे चित्रण आपोआपच दिर्घकथेचा घाट घेते. या कथांचे कथानक अनुभवाच्या वेगवेगळया पातळयांवर घडत असूनही अनेक अनुभव घटकांची एकात्मता सहजपणे साधली आहे. जीवनाबद्दलची सकारात्मक व समंजस दृष्टी निर्माण करण्यात आशा बगे यांच्या दर्पण मधील कथा यशस्वी ठरल्या आहेत.

**प्रतिद्वंद्वी -**

या कथासंग्रहात दुसरा, किती दूर, निर्मोही, सखी या चार दीर्घकथा आहेत. माणसाला माणूस शोधून त्याची नातेसंबंधाला कुठे जोड देता येते का? याचा शोध या कथा घेतात. या कथेच्या बाबतीत राजीव काळे म्हणतात की," नात्यातला तोल राखताना आणि तो राखत स्वतःला सावरतांना माणसाच्या मनात उठणारे वादळ व तरंग याची विविध रूपे कथांमधून जागोजागी भेटत राहतात." आशा बगे यांच्या कथांमधून वरील विधानाचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही. या कथा ज्याप्रमाणे कौटुंबिक भान असलेल्या आहेत त्याचप्रमाणे नातेसंबंध आणि सामाजिकतेसाठी जपणाऱ्या आहेत.

**कथांचे विशेष :-**

१) लालित्यापेक्षा सहजतेवर वास्तवाच्या चित्रणावर त्यांचा भर असतो त्यामुळे त्यांच्या कथा जीवनानुभव म्हणून रुजतात, आवडतात.

२) चांगल्या मनाच्या, संस्काराच्या माणसांचे प्रतीक म्हणून गाण्याची आवड, कवितेची आवड आदी गुणविशेष वापरण्याची लेखिकेची शैली आहे.

३) वेगवेगळया वातावरणात बहुधा स्त्रीव्यक्तिरेखांचे मनोव्यापार मांडणाऱ्या या सर्व कथा लेखिकेच्या पटकन पकड घेणाऱ्या शैलीमुळे मनाला भिडतात.

४) कथांची वाक्यरचना, शब्दरचना सुशिक्षित मराठी घरात वापरल्या जाणाऱ्या भाषेसारखी असली तरी ती पुणेरी नाही. त्यांच्या भाषेला असलेला नागपुरी साज हा त्यांच्या कथांना एक वेगळेपणा बहाल करतो.

५) वरणफळं, उकळपेंडी, बोंड अशी पदार्थाची नावे आणि 'इथं दहाला नळ जातो. मग टाक्यातले खारे पाणी घ्यावे लागेल' अशी वाक्ये त्यांच्या कथांचा भौगोलिक परिसर स्पष्ट करतात.

६) कथानकाचा आशय आणि आवाका हा व्यापक असतो. सतत येणारे विविध रागांचे, शास्त्रीय चिजांचे, स्वरांचे उल्लेख हा तर बगे यांच्या लेखनाचा एक विशेष ठरला आहे.

७) स्त्री स्वातंत्र्य, स्त्रीचे अधिकार, बदललेली शहरी स्त्री हे काहीसे शहरी वास्तव एका बाजूला तर नोकरी करुन संसाराला हातभार लावूनही कायम दुय्यम भूमिका घ्यावी लागणारी स्त्री एका बाजूला. स्त्रीच्या आजच्या अशा दोन अवस्थांपैकी दुसऱ्या अवस्थेचे दर्शन बगे यांच्या कथांमधून तीव्रतेने घडते.

८) जीवनाचे वेगवेगळे स्तर आणि ऋणानुबंधांचा, भावभावनांचा अनाहत नाद त्यांच्या कथांमधून केव्हा हा नाद संथ असतो, केव्हा बेभान होतो, सैरावैरा धावतो तर केव्हा चक्क प्रलय असतो.

९) जीवनाबद्दलची सकारात्मक व समंजस दृष्टी त्यांच्या कथांमधून प्रत्ययास येते.

१०) अप्रगट मनाची गुंतागुंत, संज्ञा प्रवाह, वेगवेगळे गंड यांचा वर्तनावर होणारा परिणाम व त्यातून कुटुंबातील नाती, घटना, समस्या आणि बाह्य क्षेत्रातले व्यक्ती व्यक्तीमधील मानसिक नाते व त्यातील चढउतार त्यांच्या कथांमध्ये असतात.

११) स्त्रीविशिष्ट अनुभवातून आलेली शैलीवैशिष्ट्ये उदा. स्वयंपाक घरातील शैली विशिष्टता म्हणून आशा बगे यांच्या लेखनात मैत्रीचा अनुभव 'जुन्या मुरलेल्या लोणच्यासारखा असतो. आणि फोड धूवून घेतली तरी तिचं तिखट-आंबटपण जाणार नाही अशा पध्दतीचा असतो. (मारवा, १९८४ पृ. १०५) पेटीतून निघणाऱ्या सुरांचे वर्णन 'यमनातले गांधार-निषाद समईतल्या वातीसारखे पुढे सारले गेले' अशा देवघरातल्या शब्दनिधीच्या माध्यमातून येतो. शरीरनिष्ठ अनुभवांची भाषा उदा. नको असलेल्या शरीरसंगाचे वर्णन 'एक किळसवाणी शिरशिरी अंगभर उठली. (मारवा-रुक्मिणी पृ. १८०) या शब्दात येतो. हाच अनुभव 'डोळे' या कथेत 'अंगाला चिकटणा-या स्पर्शाची पिसं, ती जवळीक आणि सर्वाहून ती दृष्टी. तिला एकदम रिकामं वाटतं. गळून गेल्यासारखं पोटातला गर्भही गळून पडतोय असंही काही काही' (मारवा डोळे पृ ९४) प्रसुती वेदनेचा अनुभव 'कमरेतून अंगभर उठणाऱ्या असह्य लाटा इ (मारवा- जन्म पृ १०१)

**सारांश –**

आशा बगे यांच्या कथांतील संवेदनशीलता, पारंपरिक, सांस्कृतिक व्यूहाचा एक घटक असल्यासारखी आहे. परंपरेने चालत आलेले मूल्य, नैतिक आदर्श यांच्याशी एकरुप होवून त्यांनी लेखन केले. परंतु एवढे असूनही त्यांच्या कथेतील नायिका स्वतःची एक नवी ओळख जोपासत असते. या स्त्री प्रतिमा पारंपरिक वाटल्या तरी पुढे त्यांच्या नायिका पारंपरिक चौकटी जाणिवपूर्वक तोडतांना दिसतात. बुध्दिमान, बंडखोर पण गंभीर आणि खंबीर प्रवृत्तीच्या या नायिका स्त्रीत्वाच्या मर्यादा कधीही ओलांडत नाहीत हेच त्यांचे वैशिष्ट्य आहे. मानवी जीवन त्यातील नात्यांचे अनेक विभ्रम, नात्यांकडे अलिप्ततेने पाहण्याची दृष्टी. व्यक्तीच्या जीवनदर्शनाद्वारे अनेक प्रश्नांचा घेतला गेलेला वेध हे सारेच आशा बगे यांच्या प्रतिभावान लेखणीतून सरसपणे उतरले आहे. यासाठी अत्यंत तलम, हळूवार, तरल अशा भाषाशैलीच्या उपयोगामुळे त्यांच्या कथांना एक वेगळेच परिमाण लाभले आहे. स्वत्वापाशी घेवून जाणाऱ्या तरीही सहज सुंदर नैसर्गिक भावविश्व उलगडून दार्खावणाऱ्या त्यांच्या कथा आहेत. या वेगळेपणामुळेच तामिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम, गुजराती, बंगाली व इंग्रजी भाषांमध्येही त्यांच्या काही कथांचे अनुवाद झाले आहेत. व्यक्तीचे चिंतनशील कौटुंबिक भावविश्व जे सामाजिक वास्तवावर आधारित आहे आणि जीवनाचे अंतिम स्वरुप समजावून घेत आहे अशा भावविश्वाचा परिपाक म्हणजेच आशा बगे यांच्या कथा आहेत.

**संदर्भ ग्रंथ –**


1. निसटलेले (कथासंग्रह) -आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पुनर्मुद्रन ६ मलपृष्ठ.
2. सत्यकथा - अशोक राजवाडे, ऑगस्ट १९८१,पृ. क्र. ८८
3. स्त्रीयांचे कथालेखन: नवी दृष्टी, नवी शैली - डॉ. मंगला वरखेडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद २००५ पृ. ९४.
4. दर्पण (कथासंग्रह) - आशा बगे, मौज प्रकाशन गृह, मुंबई पृ. क्र.१४२
5. दर्पण (कथासंग्रह) - आशा बगे, मौज प्रकाशन गृह, मुंबई पृ. क्र. १५१
6. दै. महाराष्ट्र टाईम्स, २६ फेब्रु. २००६
7. मारवा (कथासंग्रह) - आशा बगे, मौज प्रकाशन गृह, मुंबई १९८४, पृ. क्र.१०५
8. मारवा (कथासंग्रह) - आशा बगे, मौज प्रकाशन गृह, मुंबई पृ. क्र. १८०
9. मारवा (कथासंग्रह) - आशा बगे, मौज प्रकाशन गृह, मुंबई पृ. क्र. ९४.